# तुकाराम - रामदास

१९५७

IRBK-0106447

किंमत १० आणे

जगताप-कारले प्रकाशन, पुणें २.

म. ग्रं. सं. ...
वा. क्र. ६७८८ ... नों. दि. ...
वि. आ. वा.

# तुकाराम

अनुक्रम २१०४००
विभाग वाङ्मय
क्रमांक ७६५४
नों. दि. १९-१२-५६



IRBK-0106447

असाध्य ते साध्य । करीता सायास ॥
कारण अभ्यास । तुका म्हणे ॥

* * *

एक एका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ॥

* * *

अर्थे विण पाठांतर कासया करावे ।
व्यर्थाचि मरावे घोकुनीया ॥

* * *

शांती परते नाही सुख । येर अवघेचि दुःख ॥

* * *

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥
तोची साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ।

## सत्संग हा बरा

ढेकणाचा संगे हिरा जो भंगला ।
कुसंगे नाडला तैसा साधु ॥ १ ॥
ओढाळाच्या संगे सात्त्विक नासली ।
क्षण एक नाडली समागमे ॥ २ ॥
डाकाचे संगती सोने हीन झाले ।
मोल ते तुटले लक्ष कोडी ॥ ३ ॥
विषाने पक्वान्ने गोड कडू झाली ।
कुसंगाने केली तैसी परी ॥ ४ ॥
भावे तुका म्हणे सत्संग हा बरा ।
कुसंग हा फेरा चौऱ्याशीचा ॥ ५ ॥

## गुणाने थोरवी मिळते

दह्याचिया अंगी निघे ताक लोणी ।
एका मोले दोन्ही मागो नये ॥ १ ॥
आकाशाचे पोटी चंद्र तारांगणे ।
दोहींशी समान पाहो नये ॥ २ ॥
पृथ्वीचिया पोटी हिरा गारगोटी ।
दोहींसी संसाटी करू नये ॥ ३ ॥
तुका म्हणे तैसे संत आणि जन ।
दोहींसी समान भजू नये ॥ ४ ॥

## सत्संग हा बरा

'फुला संगे मातीस वास लागे.' फुलाची संगत मातीला सु-वास देते. चांगल्या संगतीचा हा चांगला परिणाम झाला. पण संगत वाईट मिळाली तर—ठेकणाच्या संगतीने कठीण हिरा-सुद्धा फुटतो. ओढाळ गाईबरोबर चांगली गाय सुद्धा दुसऱ्याच्या पिकात चरून येते. वाईट संगतीने भला माणूस बुरा बनतो. अहो, सोन्याला डाग लागला कीं, ते हिणकस बनते ना ? तसेच, गोड पक्वान्न विषाने कडू होणारच. हे सगळे लक्षात घेऊन महाराज सांगतात, सत्संग हा बरा. म्हणून सत्संग धरा. कुसंग सोडा. मोरोपंतानी म्हटले आहे—

"सुसंगति सदा घडो । सुजन वाक्य कानी पडो ॥"

## गुणाने थोरवी मिळते

संत म्हणजे चांगल्या वागणुकीचे लोक आणि व्यवहारी माणसे यांची योग्यता सारखीच समजू नये, असे या अभंगात सांगितले आहे. एकाच दह्यापासून निघणारे ताक आणि लोणी एकाच मोलाने विकत नाही. एकाच आकाशात असणारा चंद्र आणि चांदण्या एकाच योग्यतेच्या समजत नाहीत. एकाच खाणीत निघालेला हिरा आणि गारगोटी सारख्या मोलाने विकत नाही. हिऱ्याचे गुण निराळे, गारेचे गुण निराळे. तसे संताचे गुण निराळे, सामान्य माणसाचे निराळे; हे ओळखून संताना थोर मान द्यावा.

## क्षमा

क्षमा शस्त्र जया नराचिया हाती ।
दुष्ट तयाप्रति काय करी ॥ १ ॥

तृण नाही तेथे पडिला दावाग्नि ।
जाय तो विझोनि आपसया ॥ २ ॥

तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित ।
धरा अखंडित सुखरूप ॥ ३ ॥

× × ×

धन्य तेचि प्राणी क्षमा ज्यांचे अंगी ।
न भंगे प्रसंगी धैर्यबळ ॥ १ ॥

न म्हणे कोणासी उत्तम वाईट ।
महत्त्व वरिष्ठ नसे जेथे ॥ २ ॥

अंतरी सबाह्य सारिखे निर्मळ ।
हृदय कोमळ गंगारूप ॥ ३ ॥

तुका म्हणे काया कुरवंडीन तया ।
ठेवीन मी पाया मस्तक हे ॥ ४ ॥

# क्षमा

क्षमा हे थोर शस्त्र आहे. असे शस्त्र ज्या सज्जनाचे हाती असेल तो अपराध्याला शिक्षा करीत नाही. दुसऱ्याच्या चुकीला तो क्षमा करतो. दुष्ट माणूसही त्याला त्रास देणार नाही. अग्नि गवतावर पडला तर ते पेटेल. गवतच नसेल तर पेटणार काय ? क्षमेमुळे राग उरत नाही. राग उरलाच नाही तर रागामुळे लागणारी आग कशी पेटेल ? महाराज म्हणतात, सर्वांचे हित क्षमेमुळे घडते. ती क्षमा सतत मनात बाळगा. रागाच्या आहारी जाऊन भलत्याच गोष्टी करू नका.

× × ×

ज्याचे अंगी क्षमा असते; त्याच्याच ठायीं धैर्य असते. त्यामुळे कसल्याही कठीण प्रसंगी त्याचे धैर्य सुटत नाही. तो कोणास चांगला म्हणत नाही, कोणाला वाईटही म्हणत नाही. कोणाला उगाच तो मोठेपणाही देत नाही. क्षमा-शील माणूस असा आत-बाहेर, अगदी सारखा निर्मळ असतो. त्याचा मनात पाप नसते. गंगा नदीसारखे त्याचे मन कोवळे असते. तुकाराम महाराज म्हणतात, ज्याचे अंगी क्षमा आहे, तो नर धन्य आहे. मी माझे शरीर त्याचे वरून ओवाळून टाकीन. त्याच्या पाया-वर डोके ठेवीन. इतका तो माणूस थोर. त्याच्या अंगची क्षमा त्याहूनही थोर आहे.

## खरा संत

अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ ।
त्याचे गळा माळ असो नसो ॥ १ ॥

आत्मअनुभवी चोखाळिल्या वाटा ।
त्याचे माथा जटा असो नसो ॥ २ ॥

परस्त्रीचे ठायी जो का नपुंसक ।
त्याचे आंगा राख असो नसो ॥ ३ ॥

परद्रव्या अंध निंदेसी जो मुका ।
तोची संत देखा तुका म्हणे ॥ ४ ॥

× × ×

जेथे कीर्तन करावे ।
तेथे अन्न न सेवावे ॥ १ ॥

बुका लावू नये भाळा ।
माळ घालू नये गळा ॥ २ ॥

तट्टा वृषभासी दाणा ।
तृण मागो नये जाणा ॥ ३ ॥

तुका म्हणे द्रव्य घेती ।
देती तेही नरका जाती ॥ ४ ॥

# खरा संत

संत कोण? खरा संत कोण? त्याला कसा ओळखावा हे या अभंगात सांगितले आहे. ज्याचे मन निर्मळ आहे. ज्याच्या बोलण्यात गोडी आहे, त्याच्या गळ्यात माळ असली किंवा नसली तरी तो माणूस संत होय. जो स्वतःच्या अनुभवाने, स्वतःच्या विचाराप्रमाणे वागतो, त्याच्या डोक्यावर जटा असोत अथवा नसोत, तो संतच समजावा. परक्या माणसाच्या स्त्रीशी जो पाप बुद्धीने वागत नाही, त्याच्या अंगाला राख असली किंवा नसली तरी तो संत होय. लोकांच्या पैशाचा जो अपहार करीत नाही– तसेच लोकांची जो निंदा करीत नाही; त्याला संत म्हणावे. संतपणा वागणुकीत आहे. टिळेमाळा, पोशाख, जटा, राख यात संतपणा नाही.

× × ×

खरा संत जेथे कीर्तन करतो तेथे अन्न घेत नाही. कपाळाला बुक्का लावून घेत नाही. गळ्यात माळा घालून घेत नाही. इतकेच काय पण त्याच्या घोड्याला दाणा, बैलाला वैरण सुद्धा तो तेथली घेत नाही. कीर्तनासाठी पैसाही घेत नाही. तो खऱ्या संत-धर्माने वागतो. कीर्तनासाठी संताना जे पैसे देतात व जे संत कीर्तनाचा पैसा घेतात ते दोघेही नरकाला जातात, असे तुकाराम महाराज सांगतात. याचा अर्थ लोकांची सेवा त्यागबुद्धीने करावी. सेवेत स्वार्थ नसावा. स्वार्थ साधू नये.

## ढोंगी साधु

डोई वाढवूनि केश ।
भुते आणिती अंगास ॥ १ ॥
तरी ते नव्हती संतजन ।
तेथे नाही आत्मखुण ॥ २ ॥
मेळवूनि नरनारी ।
शकुन सांगती नानापरी ॥ ३ ॥
तुका म्हणे मैंद ।
नाही त्यापासी गोविंद ॥ ४ ॥

× × ×

मोले घातले रडाया ।
नाही असू आणि माया ॥ १ ॥
तैसा भक्तिवाद काय ।
रंगबेगडीचा न्याय ॥ २ ॥
वेठी धरिल्या दावी भाव ।
मागे पळायाचा पाव ॥ ३ ॥
काजव्याच्या ज्योती ।
तुका म्हणे नलगे वाती ॥ ४ ॥

# ढोंगी साधु

जगात खऱ्याबरोबर खोटे लोकही नांदतात. तसेच कांही खरे साधु असतात तर कांही खोटे साधु असतात. खोटे साधु तेच भोंदू. हे भोंदू लोक डोक्याचे केस वाढवितात. जटा राखतात. मोरे अंगांत भुते आणतात, भोळ्या भावड्या माणसाना जमवतात. त्याना शकून सांगतात. त्यानी जरी असे सोंग घेतले तरी ते खरे संत नाहीत, साधु नाहीत; भोंदू आहेत. कारण त्यांचे ठायी देवाची भक्ति नाही. अशा भोंदूना ओळखा. लिंबू, नारळ, अंगारा-धुपारा यास फसू नका. महाराज असे बजावून सांगतात ते ध्यानात ठेवा.

× × ×

हा माणूस देवाची भक्ति करणारा आहे, हे त्याने घेतलेल्या सोंगावरून लक्षात येत नाही. कांही ठिकाणी पैसे देऊन-मोलाने–रडायला बायका आणतात. या मोलकरणींचे मनात माया नसते, डोळ्यात आसू येत नाहीत; तरी त्या रडतात, ओरडतात! हे रडणे खरे नाही. ढोंग आहे हे. तसे ढोंगी साधु ओळखावेत. वेठीला धरलेल्या माणसाचे मनात कामाचे प्रेम कसे असेल? त्याला काम चुकवून पळायला कसे मिळेल, हेच तो पाहणार! काजव्याची चमक क्षणभर. वातीसारखी ज्योत काजवा देणार नाही. अंतःकरणात भक्ति असल्याशिवाय साधु होता येणार नाही. मनात भक्ति, प्रेम, माया पाहिजे. ‘ जाळावाचून कढ नाही, नी मायेवाचून रड नाही.’ हे ध्यानात धरा.

## वाईट वागणूक सोडावी

ऐसे संत झाले कळी ।
तोंडी तमाखुची नळी ॥ १ ॥
स्नानसंध्या बुडविली ।
पुढे भांग वोडवली ॥ २ ॥
भांगभुर्का हे साधन ।
पचनी पडे मद्यपान ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघे सोंग ।
तेथे कैचा पांडुरंग ॥ ४ ॥

× × ×

वाढवूनि जटा लावूनिया राख ।
भोंदी जन लोक नानापरी ॥ १ ॥
ध्यान धरुनिया अरण्यात बैसे ।
गळा घाली पाश मार्गस्थासी ॥ २ ॥
प्रातःकाळी जपे रुद्राक्षाच्या माळा ।
अंतरीच्या कळा शुद्ध नाही ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याचे जळो अंतःकरण ।
करिता ताडन दोष नाही ॥ ४ ॥

# वाईट वागणूक सोडावी

काही लोक आपण संत झालो म्हणून सांगतात. पण त्यांच्या अंगी संयम नसतो. त्यांची व्यसने सुटलेली नसतात. तंबाखू ओढणे चालूच असते. स्नानसंध्या यांचा पत्ता नाही. तंबाखूचे पुढे भांगेवर मजल जाते. कांही जण तर दारूही पितात. तर मग हे लोक संतांचे सोंग लोकाना फसविण्यासाठीं घेतात. अशा संताना पांडुरंग कसा भेटेल? पांडुरंगाच्या भेटीसाठी देवावर श्रद्धा पाहिजे. त्याची भक्ति व चांगली वागणूक यात संतपणा आहे.

× × ×

जटा वाढवल्या, आंगाला राख लावली. पण कशासाठी ? लोकाना भोंदण्यासाठी हे सोंग केले. असा भोंदू वनात ध्यान धरून बसला; तरी ते वाटसरूना लुटण्यासाठी. अशा भोंदूने पहाटे माळ घेऊन जप केला; तरी त्याचे मन शुद्ध असणार नाही. ज्याचे मन शुद्ध नाही त्याचा धिक्कार असो. अशा भोंदूला ठोकून ताळ्यावर आणण्यात दोष नाही.

अनुक्रम २९४७० विभाग वाङ्मय ७६५ दि. १५/१२/५७

## पापाची वासना नको

पापाची वासना नको दावू डोळा ।
त्याहुनी अंधळा बराच मी ॥ १ ॥
निंदेचे श्रवण नको माझे कानीं ।
बधिर करोनी ठेवीं देवा ॥ २ ॥
अपवित्र वाणी नको माझ्या मुखी ।
त्याजहुनि मुका बराच मी ॥ ३ ॥
नको मज कधी परस्त्रीसंगति ।
जनातून माती उठता भली ॥ ४ ॥
तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा ।
तू एक गोपाळा आवडसी ॥ ५ ॥

× × ×

पुण्य परउपकार पाप ते परपीडा ।
आणिक नाही जोडा दुजा यासी ॥ १ ॥
सत्य तोचि धर्म असत्य ते कर्म ।
आणिक हे वर्म नाही दुजे ॥ २ ॥
गति तेचि मुखी नामाचे स्मरण ।
अधोगति जाण विन्मुखता ॥ ३ ॥
संतांचा संग तोचि स्वर्गवास ।
नको तो उदास अनर्गळ ॥ ४ ॥
तुका म्हणे उघडे आहे हित घम ।
जयाचे उचित करा तैसे ॥ ५ ॥

# पापाची वासना नको

तुकाराम महाराजाना निर्मळ वागणूक फार आवडते. महाराज म्हणतात, देवा, माझ्या मनात पाप करण्याचा विचारच येऊ देऊ नको. माझ्या डोळ्याला पापी कृत्य दिसू देऊ नको. पाप पाहण्यापेक्षा आंधळा झालो तर बरे. देवा, माझ्या कानावर निंदेचे शब्द पडू देऊ नकोस. त्यापेक्षा बहिरा होणे मला परवडेल. देवा, माझ्या तोंडातूनही अमंगळ शब्द पडू नयेत. त्यापेक्षा मी मुका झालो तर चालेल. देवा, परस्त्री संगतीपेक्षा मरण आलेले चांगले असे मी मानतो. मला अवघ्या पापांचा कंटाळा आहे. गोपाळा, देवा, तू मला आवडतोस. तुझी भक्ति आवडीने होईल असे कर.

× × ×

परोपकारासारखे पुण्य नाही. परपीडेसारखे पाप नाही. यासाठी महाराज म्हणतात, माझ्या हातून परोपकार घडू दे. त्याप्रमाणेच सत्य हाच खरा धर्म आहे. सत्याची वागणूक देवा, माझ्याकडून करवून घे. देवा, तुझ्या नामाचे स्मरण करणे हेच चांगली गति मिळाल्याचे लक्षण आहे. तसेच संतांच्या संगतीत राहणे हे स्वर्ग सुखाइतके थोर आहे. तो संतसंग, देवा, मला मिळू दे. माझ्या हिताचा तसाच नाशाचाही रस्ता मला मोकळा आहे. पण तुझ्या कृपेने हिताच्या योग्य वाटेने, देवा, मला ने हीच प्रार्थना.

## नीतीची वागणूक

कन्येचा जे नर करिती विकरा ।
ते जाती अघोरा नर्कपाता ॥ १ ॥
नाम गाउनीया द्रव्य जे मागती ।
नेणो तया गति कैशी होय ॥ २ ॥
कैसे होईल त्यांचे तेच हो जाणती ।
आम्हासी संगती नलगे त्यांची ॥ ३ ॥
आमुचा सांगाती आहे तो श्रीहरी ।
नलगे दुराचारी तुका म्हणे ॥ ४ ॥

× × ×

दया तिचे नाव भूतांचे पाळण ।
आणिक निर्दळण कंटकांचे ॥ १ ॥
पाप त्याचे नाव न विचारी नीत ।
भलतेच उन्मत्त करी सदा ॥ २ ॥
धर्म नीतीचा हा ऐक वेव्हार
निवडले सार असार ते ॥ ३ ॥
तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी ।
देवासही आटी जन्म घेणे ॥ ४ ॥

# नीतीची वागणूक

कांही लोक लग्नासाठी मुलीचा पैसा घेतात. असा पैसा घेणे म्हणजे मुलीची विक्री करणे आहे. ही विक्री हे मोठे पाप आहे. त्यामुळे अशी मुलीची विक्री करणारे लोक नरकाला जातील, असे महाराज सांगतात. मुलीच्या विक्रीप्रमाणेच कीर्तनासाठी पैसा मागणाराला व पैसा घेणारालाही पाप लागते. त्यानाही कोणती वाईट स्थिति मिळेल ते सांगता येत नाही. अशा लोकांची संगत आम्हाला नको. आम्हाला श्रीहरीची संगत आहे. अशा दुराचारी लोकांची संगत नको.

× × ×

जिवाचा सांभाळ करणे याचे नाव दया. तसेच जे गुंड असतील त्यांचा नायनाट करणे याचेही नाव दयाच होय. विचार न करता उन्मत्तपणाची जी वागणूक होते, ज्या वागण्यात नीति असत नाही तेच पाप. तेव्हां नीति अनीतीचा विचार करून वागणूक घडली तर धर्म साधेल. व्यवहारही साधेल. धर्माची वागणूक म्हणजे नीतीची वागणूक. तुकाराम महाराज म्हणतात, धर्माचे रक्षण करण्यासाठी म्हणजेच नीतीची वागणूक सगळीकडे चालण्यासाठी देवाला जन्म घ्यावा लागतो. देव अनीतीची वागणूक चालू देत नाही. अनीतीचा नाश करतो. पाप्याला योग्य ती शिक्षा देतो आणि सज्जनाला सांभाळतो.

## स्वतःला ओळखा

मृगाचिये अंगी कस्तुरीचा वास ।
असे ज्याचा त्यास नसे ठावा ॥ १ ॥
भाग्यवंत घेती वेचूनीया मोले ।
भारवाही मेले वाहता ओझे ॥ २ ॥
चंद्रामृते तृप्ति पारणे चकोरा ।
भ्रमरासी चारा सुगंधाचा ॥ ३ ॥
अधिकारी येथे घेती हातवटी ।
परीक्षावंता दृष्टी रत्न जैसे ॥ ४ ॥
तुका म्हणे काय अंधळीया हाती ।
दिले जैसे मोती वाया जाय ॥ ५ ॥

× × ×

## भेदाभेद नको

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ॥ १ ॥
आइकाजी तुम्ही भक्त भागवत ।
कराल ते हित सत्य करा ॥ २ ॥
कोणाही जिवाचा न घडो मत्सर ।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥ ३ ॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव ।
सुखदुःख जीव भोगपाये ॥ ४ ॥

# स्वतःला ओळखा

आंधळ्याच्या हातात मोती दिले तर त्याची पारख आंधळा करू शकत नाही. त्याची किंमत होत नाही. कस्तुरी-मृगाच्या अंगालाच कस्तुरीचा वास असतो. पण हा वास आपल्याच अंगीं आहे. हें त्या मृगाला कळत नाहीं, तशीच माणसाची गत होते. आपल्या अंगात कितीतरी चांगले गुण असतात, पण त्याची ओळख आपल्याला असत नाही. त्या चांगल्या गुणांची ज्याना ओळख होते ते त्याचा उपयोग करून घेतात. चांदण्याचा उपभोग चकोर घेतो; सुगंधाचा उपयोग भुंग्याला होतो; त्याप्रमाणे परीक्षावंताला, गुणांची पारख होते. रत्नाची परीक्षा रत्नपारखीच करतो. हे लक्षात घेऊन स्वतःच्या गुणांची तरी स्वतःला ओळख होऊ द्या. साखरेच्या गोण्या वाहणारा बैल तिचे ओझे फक्त वाहतो व कडब्यावर जगतो. जर आपल्या जवळ गुण आहेत तर तसे भारवाहक बैल होण्याचे कारण नाही.

# भेदा भेद नको

वैष्णव म्हणजे सज्जन माणूस—सज्जनाला सगळीकडे देव भरलेला दिसतो— तो भेदभावाची वागणूक म्हणजे पाप मानतो. हा आपला नी हा परका हा भेद जेथें घडत नाही तेथें दुसऱ्याचा मत्सर कसा होईल ? कोणाचा मत्सर न करणे, सर्वांचे ठाई ईश्वर मानणे हीच खरी देवपूजा आहे. हेच देवपूजेचे वर्म आहे. हे लक्षात घेऊन सर्व प्राणीमात्रांचे ठायी समतेची व ममतेची वागणूक ठेवली पाहिजे.

# जातिभेद सोडावा

पवित्र ते कूळ पावन तो देश ।
जेथे हरिचे दास जन्म घेती ॥१॥

कर्म धर्म त्याचे जाला नारायण ।
त्याचेनि पावन तिन्ही लोक ॥२॥

वर्णअभिमाने कोण जाले पावन ।
ऐसे द्या सांगून मजपाशी ॥३॥

अंत्यजादि योनी तरल्या हरिभजने ।
तयांची पुराणे भाट जाली ॥४॥

वैश्य तुळाधार, गोरा तो कुंभार ।
धागा हा चांभार रोहिदास ॥५॥

कबीर मोमीन, लतिफ मुसलमान ।
सेना न्हावी आणि विष्णुदास ॥६॥

कान्होपात्रा खोदु, पिंजारी तो दादु ।
भजनी अभेदु हरिचे पायी ॥७॥

चोखा मेळा, बंका जातीचा महार ।
त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥८॥

नामयाची जनी कोण तिचा भाव ।
जेवी पंढरीराव तिये सवे ॥९॥

मैराळ जनक कोण कुळ त्याचे ।
महिमान तयाचे काय सांगो ॥१०॥

यातायाती धर्म नाही विष्णुदासा ।
निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥११॥

तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ ।
तारिले पतित नेणो किती ॥१२॥

## जातिभेद सोडावा

जातीचा अभिमान धरणे फुकट आहे. जातीभेद मानणेही योग्य नाही. जन्माच्या जातीवर माणसाची थोरवी नाही. तो जे कर्म करील, जी वागणूक धरील, त्यानेच तो पवित्र ठरेल, थोर होईल किंवा पापी अथवा नीच बनेल. देवाची भक्ति आणि चांगली वागणूक करणारे चोखोबासारखे हरिजनही थोर ठरले. त्यांचा उद्धार झाला. तुळाधार वैश्य, गोरा कुंभार, रोहिदास चांभार, कबीर मोमीन, लतीफ मुसलमान, सेना न्हावी, कान्होपात्रा, दादु पिंजारी, चोखामेळा व बंका महार असे हे किती तरी संत होऊन गेले. हे संत निरनिराळ्या जातीत जन्मले. त्या जातीना त्यानी थोरपणा दिला. यावरून आपण, अमूक जात हलकी, नीच, थोर असा भेदभाव मानू नये. ज्या कुळात माणूस जन्मेल ते कुळ पवित्र समजावे. कुळावरून नाही तर करणीवरून माणसाला थोरपणा मिळतो. ज्या कुळात असे चांगल्या वागणुकीचे लोक जन्मतात, ते कुळ थोर होय. तो देश थोर होय.

# रामदास

## काय करावे व कसे वागावे

१

जितके कांही आपणास ठावे
तितुके हळु हळु शिकवावे
शहाणे करून सोडावे
बहुतजन

२

शुद्ध नेटके लिहावे
लिहून शुद्ध शोधावे
शोधून शुद्ध वाचावे
चुको नये

३

अक्षर सुंदर वाचणे सुंदर
बोलणे सुंदर चालणे सुंदर
भक्ति ज्ञान कर्म सुंदर
करूनि दावी

... वाचनालय ...
६३४६ ...
२१
...

# रामदास

## काय करावे व कसे वागावे

१

जे आपण शिकलो ते हळुहळु इतर लोकाना शिकवावे. असे करीत गेले तर पुष्कळ लोक शिकतील व शहाणे होतील.

२

लिहिताना शुद्ध व नीटनेटके लिहावे. लिहून झाल्यावर पुन्हा एकदा वाचावे व वाचताना शुद्ध वाचावे म्हणजे चुका राहात नाहीत.

३

आपले लिहिणे सुंदर असावे. वाचणे चांगले असावे. बोलणे गोड असावे. वागणूक योग्य असावी. इतरावर प्रेम करावे. चांगले विचार बाळगावे. वागणूक चांगली ठेवावी.

४

ऐकल्याविण कळले
शिकल्याविण शहाणपण आले
देखिले ना ऐकिले
भूमंडळी

५

आधीच शिकोनी जो शिकवी
तोचि पावे श्रेष्ठ पदवी
गुंतल्या लोकास उगवी
विवेक बळे

६

दोष देखोनी झाकावे
अवगुण अखंड न बोलावे
दुर्जन सापडोनी सोडावे
परोपकार करूनी

७

फड नासोच नेदावा
पडिला प्रसंग सावरावा
अतिवाद न करावा
कोणा एकाशी

४

या जगात दुसऱ्याचे ऐकल्या शिवाय कळले व शिकल्या-शिवाय शहाणपण आले असे कधीही पाहावयास किंवा ऐकावयास मिळाले नाही.

५

जो आपण शिकून मग दुसऱ्यास शिकवितो तोच माणूस मोठेपणा मिळवितो. भला माणूस चांगल्या विचारांच्या बळावर लोकजागृति करतो.

६

इतरांचे दोष कधीही उघडे करू नयेत. दुसऱ्याचे दोष वारंवार बोलून दाखवू नयेत. दुष्ट माणसाबरोबर वागताना त्याच्याशी चांगलेपणाने वागावे म्हणजे आपल्या कामात अडथळा येत नाही.

७

सभेचा बेरंग करू नये. जी बाजू पडती असेल ती सावरून धरावी. कोणाशी वितंडवाद घालीत बसू नये. असे केले तर बसली बैठक उधळली जाणार नाही.

८

दुसऱ्याचे अभीष्ट जाणावे
बहुतांचे बहुत सोसावे
न सोसे तरी जावे
दिगंतरा प्रती

९

दुःख दुसऱ्याचे जाणावे
ऐकोनि तरी वाटून घ्यावे
बरे वाईट सोसावे
समुदायाचे

१०

अपार असावे पाठांतर
सन्निधचि असावा विचार
सदा सर्वदा तत्पर
परोपकारासी

८

सर्वांचे चांगले कसे करता येईल ते पाहावे. इतरांची वागणूक वाईट असली तरी ती बरीच सहन करावी. पण जर ती सोसत नाही असे झाले तर कांही काळ दूर गावी निघून जावे.

९

दुसऱ्याचे दुःख समजून घ्यावे व त्यात सहभागी व्हावे. तसेच सर्व लोक जे चांगले वाईट करतील ते सहन करावे.

१०

खूपखूप वाचावे व पाठ करावे. मनात चांगले विचार असावेत व लोकांचे भले करण्यासाठी नेहेमी तयार असावे.

# शहाणा कोण ?

१

मागील उजळणी पुढे पाठ
नेम धरावा निकट
बाष्कळपणाची वटवट
करूंचि नये

२

सुंदर अक्षर लिहावे
स्पष्ट नेमस्त वाचावे
नित्य विवरो जाणवे
अर्थांतर

३

सावधानता असावी,
नीति मर्यादा राखावी
जनास माने ऐसी करावी
क्रिया सिद्धि

४

बहुतांचे समाधान राखावे
बहुतास मानेल ते बोलावे
विलग पडो नेदावे
कथेमध्ये

# शहाणा कोण

१

जे शिकलो त्याची उजळणी करावी. नवीन गोष्टी शिकून त्या पाठ कराव्या. पोकळ गप्पा मारून वेळ फुकट घालवू नये.

२

लिहिताना अक्षर वळणदार काढावे. वाचताना मोठ्याने व व्यवस्थित वाचावे. जे वाचले असेल त्याचा अर्थ फोडून जाणून घ्यावा.

३

जगात वागताना अतिशय हुशारीने वागावे. चांगले वागावे. वाकडे पाऊल टाकू नये. लोकाना आवडतील अशीच कामे करावीत म्हणजे कामे तडीला जातात.

४

अनेक लोकाना बरे वाटेल असे बोलावे. म्हणजे सर्व लोकाना समाधान होईल. त्याना कथाकीर्तनास आणावे व त्यांच्या-बरोबर रहावे.

# संसार सुखाचा कसा होईल

१

आपण यथेष्ट जेवणे
उरले ते अन्न वाटणे
परंतु वाया दवडणे
हा धर्म नव्हे

२

तैसे ज्ञाने तृप्त व्हावे
तेंचि ज्ञान जनास सांगावे
तरते ने बुडो नेदावे
बुडत यासी

३

उत्तम गुण स्वये घ्यावे
ते बहुतास सांगावे
वर्तल्याविण बोलावे
ते शब्द मिथ्या

४

शरीर परोपकारे लावावे
बहुतांच्या कार्यास यावे
उणे पडो नेदावे
कोणा एकाचे

# संसार सुखाचा कसा होईल ?

१

आपण पोटभर जेऊन जे अन्न उरेल ते इतर कोणालाही देऊन टाकावे. परंतु फुकट घालवू नये ! अन्न वाया न घालविणे हाच धर्म आहे.

२

लोकाना असलेच ज्ञान द्यावे की ज्यामुळे लोकाना समाधान होईल. जो बुडत असेल त्याला पोहता येईल त्याने मदत करावी. बुडत्याला बुडवू नये.

३

आपण चांगले गुण घ्यावेत, नंतरच ते अनेक लोकाना सांगावेत. म्हणजे लोक अनुकरण करतील. परंतु आपण चांगले न वागता जर इतरानी चांगले वागले पाहिजे असे सांगू लागलो तर लोक आपले बोलणे खोटे मानतील.

४

दुसऱ्याचे चांगले करण्यासाठी शरीर झिजवावे. जास्तीत जास्त लोकांची सेवा करावी. इतरासाठी इतके झटावे कीं त्याला कांहीही कमी पडणार नाही.

५

दुसऱ्याच्या दुःखे दुःखी व्हावे
पर संतोषे सुखी व्हावे
प्राणि मात्रास मेळवून घ्यावे
बऱ्या शब्दे

६

नेमकेचि बोलावे
तत्काळचि प्रतिवचन द्यावे
कदापि रागासि न यावे
क्षमारूपे

७

आळस अवघाचि दवडावा
यत्न उदंडचि करावा
शब्द मत्सर न करावा
कोणि एकाचा

८

उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा
शब्द निवडून बोलावा
सावधपणे करीत जावा
संसार आपुला

५

दुसऱ्याला दुःख झाले तर आपणाला दुःख झाले पाहिजे. दुसऱ्याला आनंद झाला तर आपणाला आनंद झाला पाहिजे. आपल्या गोड बोलण्याने अनेक लोकाना आपलेसे करून घेतले पाहिजे. लोकांच्या सुखाशी व दुःखाशी एकरूप व्हावे.

६

माणसाने नेहेमी शेलके बोलावे. कोणी प्रश्न विचारला तर लगेच उत्तर द्यावे. परंतु कधीही रागावू नये. शांतपणे वागावे.

७

कधीही आळस करू नये. खूपखूप काम करावे व हे करीत असता कोणाला शब्दाने सुद्धा दुखवू नये.

८

संसार चांगला व्हावा असे वाटत असेल तर माणसाने सावधपणाने वागले पाहिजे. इतराबरोबर भाषण करताना वेचक बोलले पाहिजे; व जे आपणाजवळ आहे त्यातील निवडक पदार्थ दुसऱ्याला दिले पाहिजेत.

९

आधी प्रपंच करावा नेटका
मग घ्यावे परमार्थ विवेका
येथे आळस करू नका
विवेक हो

१०

प्रपंच सोडूनि परमार्थ चालवाल
तेणे तुम्ही कष्टी व्हाल
प्रपंच परमार्थ चालवाल
तरी तुम्ही विवेकी

११

प्रपंची जो सावधान
तो परमार्थ करील जाण
प्रपंची जो अप्रमाण
तो परमार्थी खोटा

९

अगोदर संसार चांगला करावा व मग हरिहरी करावे. संसार चांगला करण्यात आळस करू नये, हीच फायद्याची गोष्ट आहे.

अनुक्रम २९७७०
विभाग बालवाङ्मय
क्रमांक ७६.५
नों. दि. ५।२।५८

१०

संसार सोडून जर हरिहरी करीत बसाल तर तुम्हाला फारच त्रास होईल. जर तुम्ही शहाणे असाल तर संसार करून मगच हरिहरी कराल.

११

संसारात जो भला तोच देवदेव करू शकेल. जो संसारात अयशस्वी झाला त्याने देव देव करणे बरे नाही.

## उपदेशपर श्लोक

१

मनामाजि जो हेत तो चेतवावा
बरा गूण तो लाग वेगे धरावा
धरे ना तरी सर्वथाही धरेना
जनामाजि नेणीव तेही हरेना

२

बरे जाणता ते कळे सर्व काही
मने नेणता हीत काहीच नाही
जनी जाणता शीकता हीत होते
न शीके तरी व्यर्थ आयुष्य जाते

३

शिकेना तरी त्यास कांहीच येना
शिके तो गुणाला कदा जाउ देना
गुणे श्रेष्ठ तो श्रेष्ठसा वोळखावा
गुणेवीण तो हीन जाणोन घ्यावा

# उपदेशपर श्लोक

१

लोकांच्या मनातील चांगल्या भावना जाग्या कराव्यात. त्यासाठी लोकांचे गुणगान करावे लागेल. लोकांच्या गुणांची स्तुति जर केली नाही तर कांहीच कार्य होणार नाही व लोकांचे अज्ञान दूर होणार नाही.

२

जर समजून घ्यायचे ठरविले तर सर्व कळू लागते. परंतु मनात कांही शिरकवूनच घ्यायचे नाही असे ठरविले तर कांहीच फायदा होणार नाही. लोक शिकले सवरले तर त्यांचे भले होईल, पण जर ते शिकले नाहीत तर त्यांचे जगणे फुकट जाईल.

३

जो शिकत नाही त्याला कांहीही येणार नाही. पण जो शिकतो तो गुणवान होतो. खरे पाहता ज्याच्या जवळ चांगले गुण आहे तोच चांगला व ज्याचेजवळ चांगले गुण नाहीत तो मनुष्य 'हलका' समजला पाहिजे.

४

शिका रे शिका रे फुका जन्म जातो
नका रे नका रे तुका घात होतो
तुटे तूक त्या भीक तेही मिळेना
गुणेवीण लोकास काही कळेना

५

दिसामाजि काहीतरी ते लिहावे
प्रसंगी अखंडीत वाचीत जावे
गुण श्रेष्ठ उपास्य त्याचे करावे
बरे बोलणे सत्य जीवी धरावे

६

वरी चांगला अंतरी गोड नाही
तया मानवाचे जिणे व्यर्थ पाही
वरी चांगला अंतरी गोड आहे
तया लागि कोणी तरी शोधिताहे

७

भला रे भला बोलती ते करावे
बहूता जनांचे मुखे येश घ्यावे
परी शेवटी सर्व सोडोनि द्यावे
मरावे परी कीर्ति रूपे उरावे

४

लोकहो ! शिकून शहाणे व्हा ! नाही तर तुमचा जन्म फुकट आहे. शिकले नाही तर तुमचे आयुष्य फुकट जाईल. शिकून शहाणे झाले नाहीत तर तुमचा मोठेपणा कमी होईल व तुमच्या बोलण्याकडे कोणीच लक्ष देणार नाही. कारण जग गुणावरूनच माणसाची पारख करते.

५

दररोज कांहीतरी लिहावे. फुरसतीच्या वेळी खूपखूप वाचन करावे. आपणाहून गुणाने जो चांगला असेल त्याची सेवा करावी आणि नेहेमी खरे व चांगले बोलावे.

६

जो फक्त वरवर चांगला आहे. पण मनातून जो कपटी असतो त्याचे जिणे तुच्छ आहे. परंतु जो वरून चांगला व मनातही चांगला आहे, त्याच्या मागे लोक लागतील.

७

तोंडाने बोलतो तसेच वागावे. लोकांच्या चांगल्या गोष्टीच बोलाव्यात व त्यानी आपणास दिलेले यश फक्त तोंडाने स्वीकारावे. मनात गर्व करू नये. परंतु शेवटी हे सर्व सोडून द्यावे व मेल्यानंतर सुद्धा लोक आपणाला चांगले म्हणतील असेच वागावे. मनुष्य मरतो परंतु कीर्ति मागे रहाते.

# मनाचे श्लोक

१

मना सर्वथा सत्य सांडू नकोरे
मना सर्वथा मिथ्य भांडू नकोरे
मना सत्य ते सत्य वाचे वदावे
मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे

२

विवेके क्रिया आपुली पालटावी
अति आदरे शुद्ध क्रीया धरावी
जनी बोलण्या सारिखे चाल बापा
मना कल्पना सोडि संसार तापा

३

जनी वाद वीवाद सोडूनि द्यावा
जनी सूखसंवाद सूखे करावा
जगी तोचि तो शोक संताप हारी
तुटे वाद संवाद तो हीतकारी

४

फुकाचे मुखी बोलता काय वेचे
दिसंदीस अभ्यंतरी गर्व साचे
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे
विचारे तुझा तूच शोधून पाहे

# मनाचे श्लोक

१

जे खरे असेल ते सोडून कधीही खोटे बोलू नये. उगाच भांडण उकरून काढू नये. जे खरे खरे तेच तोंडाने बोलावे व जे खोटे आहे ते सोडून द्यावे.

२

योग्य विचार करून आपली वागणूक बदलून टाकावी. मनापासून चांगले वागावे. जगात नेहमीच बोलल्या प्रमाणे वागावे. हा संसार त्रासाचा आहे ही कल्पना टाकून द्यावी.

३

तंटा माजेल असा वाद माजवू नये. लोकाना बरे वाटेल अशाच गोष्टीवर चर्चा करावी. वितंडवाद घातल्याने दुःख व द्वेष वाढत जातो. म्हणून ज्या चर्चेतून कांहीं चांगले निघेल अशीच चर्चा करावी.

४

तोंडाने लांब लांब बाता मारायला काय जाते? परंतु उगाच बाता मारणाऱ्या माणसाच्या अंगात गर्विष्ठपणा वाढतो. आपण मनाला विचारले तर आपणाला हेच पटेल कीं काम केल्याशिवाय उगाच बाता मारणे फुकट आहे.

# खोट्या समजुती

१

काही दिसे अकस्मात । तेथे वाटे आले भूत
वाया पडावे संदेही । मुळी तेथे काही नाही
पुढे देखिता अंधारे । तेथे आले वाटभरे
झाड झुडूप देखिले। जी वाटे कोणी आले
पुढे रोविलासे झेंडा । भ्रांत्या म्हणे कोण उभा
रामदास सांगे खूण । भितो आपणा आपण

२

वाजे पाऊल आपुले। म्हणे मागे कोण आले
कोण धावतसे आड । पाहो जाता झाले झाड
भावीतसे अभ्यंतरी । कोण आले बरोबरी
शब्द पडसाद उठला । म्हणे कोण रे बोलिला
रामीं रामदास म्हणे । ऐशी शंकेची लक्षणे

# खोट्या समजुती

१

एकाएकी आपणाला कांही दिसेल तर आपणाला वाटते कीं भूतच आले. खरे पाहाता तेथे काही नसते, पण आपणाला उगीचच संशय येतो. समोर अंधार असतो पण आपणाला वाटते चोर आले. एखादे झाड झुडुप अंधारात आपण पाहातो तथापि आपणाला वाटते कोणीतरी आले आहे, एकादा झेंडा रोवलेला पाहिला तर वाटते कोणी तरी उभा आहे. रामदास म्हणतात कीं, खरे म्हणजे आपणच आपल्याला भितो.

२

आपलेच पाऊल वाजते पण आपणाला वाटते कीं मागून कोणी आले आहे. आपणाला वाटते कीं बाजूला कोणी तरी आहे; परंतु पहायला गेले तर ते झाड असते. आपण उगीचच मनात वाटून घेतो कीं कोणीतरी बरोबर चालत येत आहे. आपल्या शब्दाचा पडसाद उठतो. आपणाला वाटते कीं दुसरेच कोणीतरी बोलत आहे. परंतु रामदास म्हणतात कीं, हे सर्व भ्रम आहेत. त्यात खरे काही नाही.

# खरे भजन

१

भेटो कोणी एक नर, धेड महार चांभार
त्याचे राखावे अंतर, याचे नाव भजन

दु:ख न द्यावे कोणाला, उंच नीच जरी झाला
अंतरात्मा वोळखिला, तोचि जाणा सज्जन

मिळाला तो भक्त झाला, दोष मिळेना तपाला
देव प्रत्यक्ष कोपला, अहंभाव दुर्जन

राजी राखावे सकळ, बरे पण सर्वकाळ
नित्य आनंदाची वेळ, काळ करी वंदन

# खरे भजन

## १

आपणाला धेड, महार किंवा चांभार कोणीही भेटला तरी त्याच्या मनाला दुःख न देता त्याच्याशी वागणे म्हणजेच भजन होय. कोणीही उच्च कुळातला किंवा हलक्या कुळातला भेटला तरी त्याचे मन ओळखून त्याला दुःख न देता राहातो तोच खरा सज्जन होय. चांगल्या माणसाला कोणीही भेटला तरी त्याच्याशी तो एक-रूप होतो, दुसऱ्याचे दोष तो काढीत नाही. परंतु ज्याच्या अंगात मीपणा आहे, तो मनुष्य वाईटच असला पाहिजे. खरे पाहाता वाईट माणूस म्हणजे देवाचा कोपच आहे. परंतु जो सर्वांना खूष करतो, नेहेमी इतरांचे भले करतो, त्याला नेहेमी सुख मिळते व त्याची कीर्ति कायम राहाते.

# धन्य तो देश

१

धन्य त्याचे कुळ धन्य त्याचा वंश
जे कुळी हरिदास अवतरला
धन्य ते जननी धन्य ते कुसी
जे हरि प्रियासि प्रसविली
धन्य तो पै देश, धन्य तो पै ग्राम
जेथे नित्य वास, वैष्णवाचा
धन्य ते निंदक, निंदिती सज्जन
येणे भावे घडे ध्यान त्याचे
रामदास म्हणे तरीच धन्य होणे
जरी संग लागणे सज्जनाचा

# धन्य तो देश

ज्याच्या वंशात जनतेचा सेवक जन्माला आला ते कुळ धन्य आहे. जनतेचा पुढारी ज्या आईच्या पोटी जन्मला ती आई व तिची कूस धन्य आहे. ज्या गावात किंवा देशात परोपकारी साधु राहातात, तो गाव धन्य होय. जे लोक चांगल्या माणसाची निंदा करतात ते निंदक धन्य होत. कारण निंदेसाठी का होईना ते चांगल्या माणसाची आठवण काढतात. रामदास म्हणतात कीं सज्जन माणसाचा सहवास मिळणे हीच गोष्ट सर्वांत चांगली आहे.

# चांगली संगत करा

१

दुर्जन संगती कदा धरू नये
घडती अपाय बहुविधा
चांडाळ संगती होई जे चांडाळ
होय पुण्यशील साधु संगे
कुरुंद संगती झीजला चंदन
कुसंगे जीवन नासतसे
लाखेचे संगती सोने होय उणे
दूध हे लवणे नासतसे
दुर्जन संगती सज्जन ढासळे
क्रोध हा प्रबळे अकस्मात
दास म्हणे संग त्यागा दुर्जनाचा
धरा सज्जनाचा आदरेसी

# चांगली संगत करा

## १

वाईट माणसाच्या संगतीत राहू नये. कारण त्यामुळे फारच त्रास होतो. वाईट माणसाच्या संगतीने माणूस बिघडतो. पण चांगल्या माणासाच्या संगतीने सुधारतो. सहाणेच्या संगतीमुळे चंदन झिजू लागते. कारण वाईट संगतीने नाशच होणार. लाखेच्या संगतीमुळे सोन्याला सुद्धा लोक नावे ठेवतात. तसेच मिठाची संगत केल्यामुळे दूध नासून जाते. वाईट संगत केल्यामुळे सज्जन माणूस सुद्धा बिघडतो व तो संतापी बनतो. रामदास सांगतात कीं, वाईट संगत करू नका व सज्जन लोकांचा मान राखा. त्यांची संगत धरा. तरच तुम्ही सुखी व्हाल.

अनुक्रम 29760
विभाग बालवाङ्मय
नों. दि.
IRBK-0106447